2 5 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

# यशाची गुरु किल्ली शिक्षणातून मिळते : डॉ.महादेव देशमुख

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

आजचे युग हे ए.आय. चे युग आहे.या युगात यशस्वी व्हायचे असेल तर त्यासाठी कौशल्याधारित शिक्षणाची आवश्यकता आहे. म्हणून यशाची गुरु किल्ली शिक्षणातून मिळते.असे प्रतिपादन मानव विज्ञान विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने बी.ए.,बी.कॉम.,एम.ए.,एम.कॉम.,एम.एस्सी (गणित),एम.बी.ए.व ऑनलाइन एम.कॉम.,एम.एस्सी (गणित), एम.बी.ए. आदी अभ्यासक्रमातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन केले होते.त्यानिमित्ताने "पदवी व पदव्युत्तर नंतरचे करियर" या विषयावर आयोजित व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर होत्या.

डॉ.देशमुख म्हणाले की,माजी विद्यार्थी मेळावा हा जुन्या आठवणींना उजाळा देणारा आनंददायी उपक्रम आहे. तसेच माजी विद्यार्थी हा शिक्षण ,प्रगती आणि अनुभव यांची देवाण घेवाण यासारख्या मेळाव्यातून करीत असतो.त्यातून आपल्या संस्थेची समाजाची प्रगती होत असते. हेच विद्यार्थी संस्थेची ओळख असते.संस्थेतून संस्कृती ,मूल्य जतन आणि जडणघडण होत असते. माजी विद्यार्थी मेळावा हा संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे.

वेळी संचालक डॉ.पाटणकर म्हणाल्या की,शिक्षणाला वयाची अट नाही.नोकरी,व्यवसाय सांभाळून शिक्षण घेता येते.अशा साठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र कटीबद्ध आहे.माजी विद्यार्थी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अम्बेसीडर आहेत. त्यांनी या केंद्राचे पदवी,पदवीव्युत्तर व ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम समाजातील विविध घटकांपर्यंत पोहचविले पाहिजेत. डॉ.सचिन भोसले यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली.यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली.

25 AUG 2026 सिंधुदुर्ग समाचार
जनसंपर्क कक्ष
...वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्व महामानवांच्या सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत: डॉ. श्रीपाल सबनीस

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, एका धर्माचा किंवा एका विचारपरंपरेचा नाही. बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णाभाऊ साठे अशा सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आज केले.




पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे येथील शाहू स्मारक भवनात आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार' आणि ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन.डी. जत्राटकर आणि ज्येष्ठ पत्रकार, लेखक डॉ. संजय थोरात यांना 'लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

डॉ. सबनीस म्हणाले, भारतीय संस्कृतीची निर्मिती केवळ एका जातीत, धर्मात किंवा अभिजन-बहुजनांच्या कोणत्याही एका समूहात झालेली नाही. सर्व जाती-धर्म, आदिवासी समाज, अभिजनांचे ज्ञान, बहुजनांचे श्रम आणि सामान्य माणसाचे योगदान यांतून भारतीय संस्कृती घडली आहे. त्यामुळे कोणत्याही एका विचाराला वगळून भारताचा समग्र विचार करता येणार नाही.

**बाबा भारती हे समन्वय, समता आणि संवादाचे प्रतीक**

बाबा भारती यांच्या विचारांचे विवेचन करताना डॉ. सबनीस म्हणाले, बाबा भारती बौद्ध विचारांशी निष्ठावान असले तरी एका धर्माच्या चौकटीत अडकले नाहीत. बुद्ध धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्सवाद, गांधीवादी विचार यांसह विविध ज्ञानपरंपरांचा त्यांनी चिकित्सक अभ्यास केला. विविध विचारांमधील मानवकल्याणकारी मूल्यांचा समन्वय साधणे ही त्यांची भूमिका होती. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानने त्यांची हीच समन्वयवादी भूमिका पुढे नेत विविध जातिधर्मांतील आणि सामाजिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या मानवतावादी दृष्टीच्या व्यक्तीमत्त्वांचा गौरव केला आहे, ही अभिमानाची बाब आहे.

**'कुलगुरूंना बाबा भारती पुरस्कार मिळणे विशेष आनंदाचे'**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष आनंद व्यक्त करताना डॉ. सबनीस म्हणाले, "अनेक वर्षांत अनेक पुरस्कार दिले; मात्र एका कुलगुरूंना बाबा भारतींच्या नावाचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना मला विशेष धन्यता वाटते. डॉ. कामत यांच्या मनोगतात जातिधर्मभेदापेक्षा ज्ञानाला दिलेले महत्त्व स्पष्टपणे जाणवते. शिवाजी, ज्ञानेश्वर आणि बुद्ध यांच्या विचारांचा समन्वय करणारे कुलगुरू म्हणून डॉ. कामत यांची भूमिका उल्लेखनीय असल्याचे सांगितले.

शिवाजी विद्यापीठातील पाली भाषेच्या अभ्यासक्रमाला बाबा भारतींचे नाव देण्याबाबत विचार व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत त्यांनी पाली भाषा, बौद्ध वाङ्मय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आयुष्यभर केलेले कार्य अतुलनीय असल्याचे सांगितले. १९८७ मध्ये प्रकाशित झालेला सुमारे २५ हजार शब्दांचा पाली-मराठी शब्दकोश हे त्यांच्या कार्याचे शिखर असून, पाली भाषेचा आणि बौद्ध वाङ्मयाचा विस्मृतीत गेलेला समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले, असे त्यांनी नमूद केले. कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या शैक्षणिक नेतृत्वाचा उल्लेख करताना, संशोधन, तंत्रज्ञान, डिजिटल युगातील आव्हाने आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संक्रमणकाळात त्यांनी विविध महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांचे नेतृत्व केले असून शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञान, संशोधन व शिक्षणाच्या समृद्ध परंपरेला आधुनिक काळात पुढे नेण्याचे कार्य ते करीत असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले. चांगला शिक्षक, संशोधक, विचारवंत आणि लेखक आपल्या कार्याचा गंध दीर्घकाळ समाजात टिकवून ठेवतो आणि अशा कर्तृत्वाची स्मृती जिवंत ठेवण्याचे काम पुरस्कारांच्या माध्यमातून होते, असेही त्यांनी नमूद केले.

पुरस्काराला उत्तर देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी लोकशिक्षक बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना, पाली-मराठी शब्दकोशाच्या माध्यमातून त्यांनी बुद्धांचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे अतुलनीय कार्य केले असल्याचे सांगितले. हा शब्दकोश केवळ शब्दांचा संग्रह नसून ज्ञानाचे लोकशाहीकरण करणारा आणि सामान्य माणसाला मूळ बुद्धविचारांशी जोडणारा महत्त्वपूर्ण सेतू असल्याचे त्यांनी नमूद केले. ज्ञान हे विद्यापीठे आणि ग्रंथालयांच्या चौकटीत मर्यादित न राहता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, हीच लोकशिक्षकाची खरी भूमिका असल्याचे स्पष्ट करत त्यांनी शिक्षकापेक्षा लोकशिक्षक बनण्याचे मोठे सामाजिक दायित्व अधोरेखित केले. नव्या पिढीशी केवळ वर्गखोल्यांतून नव्हे, तर त्यांच्या मनाशी व हृदयाशी संवाद साधत ज्ञानाचा वारसा पुढे नेण्याची आवश्यकता व्यक्त करत, बाबा भारती यांच्या नावाने मिळालेला हा जीवनगौरव सन्मान आपण कृतज्ञतेने स्वीकारत असून शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीला अधिक सक्षमपणे पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रमुख अतिथी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह पुरस्कारप्राप्त डॉ. एन.डी. जत्राटकर आणि डॉ. संजय थोरात यांनीही मनोगते व्यक्त केली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. हरिष भालेराव, डी.जी. भास्कर, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. जी.बी. अंबपकर, अनिल म्हमाणे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मानसिंग टाकळे यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरूषोत्तम सदाफुले, विनायक ठोंबरे, अजित पाटील, मल्हार जोशी, आनंदा कांबळे, प्रकाश कांबळे, सचिन कांबळे, आर.के. कांबळे, आप्पा देशमुख, विजय कांबळे, हंबीरराव पाटील, रमेश ढाले, रविंद्र भारती, निमिष भारती, शार्दूल भारती, जय भारती, अमोल ढाले, राजरत्न गाडे आणि अभिजीत भोसले यांनी संयोजन केले.

2 5 AUG 2026 सिंधुदुर्ग समाचार जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्थानिक कथांना जागतिक व्यासपीठ देण्याची ॲनिमेशन, व्हीएफएक्स क्षेत्रात मोठी संधी : अर्जुन माधवन




कोल्हापूर/प्रतिनिधी :

भारतातील स्थानिक, अस्सल आणि समृद्ध कथा जागतिक दर्जाच्या ॲनिमेशन व व्हीएफएक्सच्या माध्यमातून जगभर पोहोचविण्याची मोठी संधी आजच्या पिढीसमोर आहे. 'ग्लोबल' होण्यासाठी स्थानिकत्व सोडण्याची नव्हे, तर आपल्या मातीतल्या कथा अधिक प्रामाणिकपणे आणि जागतिक दर्जाने मांडण्याची गरज आहे. 'जितके अधिक स्थानिक, तितके अधिक अस्सल आणि तितकेच अधिक जागतिक', असे प्रतिपादन असेंब्लेज एंटरटेनमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन माधवन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आज 'फ्रॉम क्लासरुम टू ग्लोबल स्क्रीनः करिअर्स इन अ चेंजिंग क्रिएटिव्ह इंडस्ट्री' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमात 'नागरी जाणिवा' या विषयावर घेण्यात आलेल्या व्यंगचित्र स्पर्धेचे पारितोषिक वितरणही करण्यात आले.

यावेळी अर्जुन माधवन यांनी ॲनिमेशन, व्हीएफएक्स आणि क्रिएटिव्ह इंडस्ट्रीतील वाढत्या संधींचा वेध घेतला. ते म्हणाले, आज कलाकार, क्रिएटर्स, कथाकार, व्हिज्युअलायझर्स, डिझायनर्स, तंत्रज्ञ आणि तंत्रज्ञान जाणणाऱ्या व्यक्ती क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या क्षेत्रात केवळ कलात्मक कौशल्य पुरेसे नसून गणित, नियोजन, व्यवस्थापन, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संबंध आणि उत्पादन व्यवस्थापन यांसारख्या विविध कौशल्यांचीही मोठी आवश्यकता आहे.

ॲनिमेशन व व्हीएफएक्समध्ये कला आणि विज्ञान यांचा अनोखा संगम असल्याचे सांगून ते म्हणाले की, पात्रांची रचना, शरीराची ठेवण, हाडांची संरचना, टेक्स्चर, त्वचा, केस, कपडे आदींचे वास्तवदर्शी सादरीकरण करण्यासाठी शरीरशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्राचे ज्ञानही उपयुक्त ठरते. त्यामुळे या क्षेत्रात 'लेफ्ट ब्रेन' आणि 'राइट ब्रेन' या दोन्ही क्षमतांचा प्रभावी वापर होतो.

भारतात तयार होणाऱ्या दर्जेदार कामाचा उल्लेख करताना माधवन यांनी जागतिक चित्रपट व मनोरंजन क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये भारतीय स्टुडिओ आणि कलाकारांच्या योगदानाकडे लक्ष वेधले. भारत पूर्वी जगाचे 'बॅक ऑफिस' म्हणून ओळखला जात होता; मात्र कौशल्य, अनुभव आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या बळावर भारत आता जागतिक क्रिएटिव्ह इंडस्ट्रीचा 'बॅकबोन' बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## कोल्हापूरच्या कथांमध्ये जागतिक क्षमता

कोल्हापूर आणि महाराष्ट्राच्या इतिहास-संस्कृतीत जागतिक स्तरावर पोहोचू शकतील, अशा असंख्य कथा दडलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, पोवाडे आणि लोकपरंपरांमधील असंख्य कथा ॲनिमेशन व व्हीएफएक्सच्या माध्यमातून जगासमोर आणता येऊ शकतात, असे माधवन यांनी सांगितले. स्थानिक कथा अधिक अस्सलपणे मांडल्या गेल्या, तर त्यांचे वैश्विक आकर्षण वाढते, असे त्यांनी अधोरेखित केले.

## 'पहिले करिअर अंतिम नव्हे'

आपल्या स्वतःच्या कारकिर्दीचे उदाहरण देताना माधवन यांनी सांगितले की, गणित व अर्थशास्त्राचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी लंडनमध्ये गुंतवणूक बँकिंग आणि प्रायव्हेट इक्विटी क्षेत्रात काम केले. ॲनिमेशन आणि व्हीएफएक्स क्षेत्रात येईन, असे त्या काळी स्वतःलाही वाटले नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या पहिल्या करिअरलाच अंतिम गंतव्य मानू नये. पदवी आपले अंतिम भवितव्य ठरवत नाही, असा संदेश त्यांनी दिला. विद्यार्थ्यांनी आपली इच्छाशक्ती, दृष्टिकोन आणि कौशल्य विकसित करण्यावर भर द्यावा. आजच्या इंटरनेटच्या युगात संधींची कमतरता नाही. 'स्किल सेट'पेक्षा 'विल सेट' अधिक महत्त्वाचा असून योग्य दृष्टिकोन, शिस्त आणि सातत्याच्या बळावर विद्यार्थी मोठी झेप घेऊ शकतात, असेही त्यांनी सांगितले.

## कलात्मक अभिव्यक्तीत समाजपरिवर्तनाची मोठी ताकदः सिद्धार्थ शिंदे

यावेळी 'नागरी जाणिवा' या विषयावर सिद्धार्थ शिंदे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, कलाकारांकडे समाजाला सकारात्मक आणि विधायक दिशेने नेण्याची अनोखी ताकद असते. व्यंगचित्र, मिमिक्री, लेखन, नाट्य, पटकथा, शॉर्ट फिल्म, व्हॉइस ओव्हर अशा कलात्मक माध्यमांतून सामाजिक प्रश्न प्रभावीपणे मांडता येतात आणि लोकांना विचार करण्यास प्रवृत्त करता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांकडे केवळ छंद म्हणून न पाहता समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून पाहावे, असे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, व्यंगचित्र हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजातील प्रश्न, विसंगती आणि नागरिकांच्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे अधोरेखित करणारे अत्यंत सामर्थ्यवान माध्यम आहे. एखाद्या व्यंगचित्रातून हजारो शब्दांत व्यक्त न होणारा आशय थेट प्रेक्षकाच्या अंतर्मनापर्यंत पोहोचतो. कलात्मक अभिव्यक्तीच्या माध्यमातून जाणीवा अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचू शकतात, असे त्यांनी सांगितले.

## 'नागरी जाणिवा' विषयावरील व्यंगचित्र स्पर्धेचे पारितोषिक वितरण

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'नागरी जाणिवा' या विषयावरील व्यंगचित्र स्पर्धा घेतली. तिचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उत्कृष्ट १० व्यंगचित्रांना गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी ड्रग्स व डोपिंग, विद्यार्थ्यांची उपस्थिती, नागरिक म्हणून सामाजिक जबाबदारी आणि परिसरातील समस्या या विषयांवर व्यंगचित्रे काढली. यामध्ये अपूर्वा रमेश गिरी, धोंडी नारायण ढवळे, दिग्विजय दुधाणे, गुरूनाथ सातप्पा म्हातुगडे, मृण्मयी सदाशिव पांचाळ, निखिल विजय जाधव, समर्थ औदुंबर शिरोडकर, सोनल विनायक खडकीकर, उन्नती अनिल पाटील आणि वैष्णवी सदाशिव मदने या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमात डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मनीष आपटे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. सरिता ठकार, डॉ. शिवाजी जाधव, अनुप जत्राटकर, बबन माने, विजय उपाध्ये, राजेश कांबळे, विवेक प्रभू केळुस्कर यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 5 AUG 2026
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भरतनाट्यममधून गुरुशिष्य परंपरा जपली

## पद्मालया नृत्यालयच्यावतीने गुरुभ्यो नमः कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क



शाहू स्मारक भवनात पद्मालया नृत्यालयाच्या वतीने गुरुभ्यो नमः हा नृत्याविष्कार सादर झाला.

**कोल्हापूर** : 'श्लोकांजली, पुष्पांजली, मिश्र अलारीपू, ज्योती स्वरम्, शिवकीर्तन, श्रीरामचंद्र कृपाल भजन, भक्ती पदम्, जावळी, देवी कीर्तनम् आणि तिल्लाना अशा भरतनाट्यम नृत्याविष्काराच्या सादरीकरणातून पद्मालया नृत्यालयाच्या विद्यार्थिनींनी गुरु-शिष्य परंपरेला वंदन केले. नृत्यालयाच्या प्रमुख नृत्यगुरू पद्मश्री बागडेकर यांच्यासह शिष्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. भारतीय शास्त्रीय नृत्यकलेतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले.

शाहू स्मारक भवनात झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, संगीत विभागाचे विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई तसेच ज्येष्ठ गुरू मोहिनी दिवाण उपस्थित होत्या. भरतनाट्यमच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, अध्यात्म, भक्ती आणि गुरु-शिष्य परंपरेचा समृद्ध वारसा जपण्याचे कार्य पद्मालया नृत्यशाळेकडून सुरू असल्याच्या भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमाची सुरुवात लहान विद्यार्थिनींच्या श्लोकांजली सादरीकरणाने झाली. त्यानंतर देव-देवता व देवींची स्तुती मांडणाऱ्या रचनांवर विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले. पद्मश्री बागडेकर यांनी 'श्रीरामचंद्र कृपाल भजन' या नृत्यरचनेत सीता स्वयंवर आणि शबरी मोक्ष हे प्रसंग विशेष आकर्षण ठरले. निधी सावर्डेकर, वैभवी कापसे आणि प्रेरणा धोत्रे, नीलम येसाटे, अमृता घनदुरे, सागर माने आणि भाग्यश्री कालेकर यांनीही उत्कृष्ट नृत्यसादरीकरण करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमाची सांगता स्वामी समर्थांच्या भक्तिमय गीताने झाली. यावेळी गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करणारा गुरु-शिष्य सत्कार सोहळा झाला. जुई कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

2 5 AUG 2026

सकाळ

# रील्स मेकिंग स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मतदान जनजागृतीसाठी घेतलेल्या रील्स मेकिंग स्पर्धेत बक्षीस मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव केला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. मास कम्युनिकेशन विभाग, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे स्पर्धेचे आयोजन केले होते. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, बेटी बचाव अभियानाच्या समन्वयक प्रा. डॉ. प्रतिभा देसाई, विद्यार्थी विकास विभागाचे तत्कालीन संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी परीक्षण केले. स्पर्धेत प्रफुल्ल कराडे (प्रथम), शहाजी निंबाळकर (द्वितीय), समृद्धी मोदक (तृतीय), प्रज्ञा भांदिगरे (उत्तेजनार्थ) आदींना प्रमाणपत्रांचे वितरण केले.

2 5 AUG 2026
लोकमत

# रिल्स स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मतदान जनजागृतीसाठी आयोजित रिल्स मेकिंग स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण झाले.

मास कम्युनिकेशन विभाग, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा घेण्यात आली. प्रफुल्ल कराडे यांनी प्रथम, शहाजी निंबाळकर यांनी द्वितीय, समृद्धी मोडक यांनी तृतीय, तर प्रज्ञा भांदिगरे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला. स्पर्धेचे परीक्षण डॉ. शिवाजी जाधव, प्रा. डॉ. प्रतिभा देसाई आणि डॉ. तानाजी चौगुले यांनी केले.

2 5 AUG 2026
सकाळ

# छंद सुखद क्षणांचे सोबती : देवळालकर

कोल्हापूर : छंद सुखद क्षणांचे सोबती असतात आणि ते आयुष्यातील उणीव भरून काढतात, असे डॉ. धनंजय देवळालकर यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'छंद' या विषयांतर्गत 'दुर्मीळ आवाजांचे जतन' या व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. नंदकुमार मोरे होते. डॉ. देवळालकर म्हणाले, 'जीवनाच्या विविध टप्प्यांवर छंद आवश्यक असतात; परंतु दुर्मीळ आवाजांचे जतन करणे हा एक ध्यास होऊन गेला. यातून दुर्मीळ गाणी, महत्त्वाच्या नेत्यांचे आवाज जतन करण्याचा छंद लागला. पेनांचा संग्रह, विविध प्रकारची घड्याळे जमवण्याचा छंद लागला. हे छंद आयुष्यातील उणीव भरून काढतात.' डॉ. मोरे म्हणाले, 'साहित्याच्या विद्यार्थ्याला सर्वांगीण दृष्टी असते. ती छंदांमुळे अधिक विकसित होते. कोणताही छंद हा आयुष्य समृद्ध करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे मिळालेली ऊर्जा अवकाश भारून टाकणारी असते.' यावेळी युवा कादंबरीकार विठ्ठल खिलारी यांचा सत्कार झाला. डॉ. सुखदेव एकल यांनी सूत्रसंचालन केले. प्रांजली क्षीरसागर यांनी आभार मानले.

25 AUG 2026

जनप्रवास

# छंद सुखद क्षणांचे सोबती : धनंजय देवळालकर

कोल्हापूर : छंद सुखद क्षणांचे सोबती असतात आणि ते आयुष्यातील उणीव भरून काढतात, असे प्रतिपादन डॉ. धनंजय देवळालकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'छंद' या विषयांतर्गत 'दुर्मीळ आवाजांचे जतन' या विशेष व्याख्यानात बोलत होते. डॉ. नंदकुमार मोरे अध्यक्षस्थानी होते. डॉ. मोरे म्हणाले, साहित्याच्या विद्यार्थ्याला सर्वांगीण दृष्टी असते. ती छंदांमुळे अधिक विकसित होते. कोणताही छंद हा आयुष्य समृद्ध करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे मिळालेली ऊर्जा अवकाश भारून टाकणारी असते. यावेळी ना. धों. महानोर पुरस्कारप्राप्त युवा कादंबरीकार विठ्ठल खिलारी यांचा सत्कार झाला. संशोधक विद्यार्थी, एम.ए.चे विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. सुखदेव एकल यांनी सूत्रसंचालन केले. प्रांजली क्षीरसागर यांनी आभार मानले.